नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 17/06/2023 (शनिवार) सायंकाळ

---

## मोटार पंप चोरी चा गुन्हा उघड
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर जिल्हा ग्रामीण ची कार्यवाही :-

दिनांक १६/०६/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोस्टे केळवद हद्दीत भागेमहारी गावाच्या शिवारातील शेतातील विहीरीतुन water pump चोरीच्या गुन्ह्याचे अनुषंगाने आरोपीचा शोध घेत असताना गुप्त बातमीदारां कडून दोन संशयित इसम व गुन्हयात वापरलेले गाडी बद्दल माहिती प्राप्त झाली. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गाड़ी नंबर वरुन गाड़ी मालक रा. मंगलवारी नागपुर येथे जाऊन शोध घेतला गाड़ी मालकने ती गाड़ी परीचित व्यक्तीला किरायाने दिल्याचे सांगितले. करिता त्या इसमास सापळा रचून आरोपी नामे- १) दीपककुमार शाहू वय ३०, रा. मंगलवाड़ी नागपुर फरार आरोपी २) रामचंद्र चचाने रा, भागेमहारी केळवद यांना ताब्यात घेऊन सदर गुन्हयाबाबत विचारपूस केली असता त्याने भागेमहारी गावाच्या हद्दीतील २ शेती मधून २ पानडुब्बी मोटर पंप चोरी केल्याचे सांगीतले त्याचे ताब्यातून चोरी केलेल्या १) laxmi कंपनिची ५ hp पानबुडी मोटर पंप किमती अंदाजे ८,०००/-रू. २) टॅक्समो कंपनिची ५ hp पानडुब्बी मोटर पंप किमती अंदाजे १०,०००/-रू. ३) एक महिंद्रा जीतो मालवाहक गाड़ी क्र MH ४० BL ०९८८ किमती अंदाजे २,५०,०००/- असा एकून ०२,६८,०००/-रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीची वैद्यकिय तपासणी करुन जप्त मुद्देमाल व कागदपत्रासह पोलीस ठाणे केळवद यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई ही पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक श्री. डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांचे नेतृत्वात सहायक पोलीस निरीक्षक राजीव कर्मलवार, पोलीस हवालदार राजू रेवतकर, अमोल कुथे, पोलीस नायक किशोर वानखेड़े, आशीष मुगले, उमेश फुलबेल यांनी पार पाडली.



## गैरकायदयाची मंडळी

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत बिना संगम खापरखेडा येथे दिनांक 15/06/2023 चे 23.45 वा. दरम्यान फिर्यादी नामे– निलेश प्रकाश सोनेकर, वय 29 वर्ष, रा. बिना संगम वार्ड क्र. 01 ता. कामठी हा त्याच्या सासऱ्याच्या घरासमोर हजर असता आरोपी नामे– 1) संजय उर्फ अन्ना अभ्यंकर, रा. भानेगाव 2) रोहीत येवले. रा. खापरखेडा 3) प्रकाश थोरात, रा. खापरखेडा 4) पंकज खापरे, रा. खापरखेडा 5) सोनु भिमगडे, रा. भानेगाव यांनी त्यांचे सोबत इतर 3 ते 4 लोकांनी 3 कारमध्ये येवुन गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादीच्या सासऱ्याच्या घरासमोर येवुन फिर्यादीला अश्लील शिवीगाळ करुन आरोपी यांनी हातात तलवारी, बेसबॉस, लाकडी दंडा व चाकु असे हातात घेवुन कारचे बाहेर येवुन फिर्यादीला अश्लिल शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली तसेच फिर्यादीचे सासरे यांची कार क्र. एम. एच. 40 बी.जी. 9370 तसेच कार क्र. एम. एच. 31 सी. आर 7618 या दोन्ही कारचे अंदाजे 30,000 रु. चे नुकसान केले.

दर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीतांविरुध्द कलम 294, 147, 148, 149, 452, 427 भांदवि. सहकलम 4, 25 भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक शरद डोंगरे, पोस्टे खापरखेडा मो. नं. 9511527770 करीत आहे.

# फसवणुक

**पो.स्टे. खापरखेडा** :– अंतर्गत वार्ड क्र. ५ दहेगाव रंगारी मोहीत गॅरेजच्या मागे दिनांक १५/०६/२०२३ चे ०८.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– हरिभाऊ दौलत आढाऊ, वय ६५ वर्ष, रा. वार्ड नंबर पाच दहेगाव रंगारी मोहित गॅरेज च्या मागे हा त्याचे घरासमोर उभे असतांना दोन अनोळखी अज्ञात आरोपी हे त्याचे मोटरसायकलने फिर्यादी जवळ आले व आम्ही पंचायत समिती वरुड येथील कर्मचारी आहोत अशी बतावणी करून तुमचा एक लाख रुपयाचा चेक आला आहे त्या चेक करिता आम्हाला तुमच्याकडून २५ हजार रुपये पाहिजे असे म्हटले असता फिर्यादी यांनी माझे कडे पैसे नाही तेव्हा तुमच्याकडुन काही तरी लागेल तुमच्याकडे पैसे नसेल तर सोन्याच्या वस्तु दया असे म्हटल्याने फिर्यादी याने त्याचे घरातील सोन्याचे ३, ५ ग्रॅमचे टॉप्स किंमती ६५००/– रु. व सोन्याची ४, ५ ग्रॅमची सोन्याची अंगठी किंमती ८,५००/– रु. असा एकुण १५,०००/– रु. चे सोन्याचे भांडे देवुन सुद्धा दोन्ही आरोपी यांनी फिर्यादीस कोणतेही कागदपत्र किंवा चेक न देता पंचायत समिती वरुडचे कर्मचारी आहोत असे बतावणी करुन फिर्यादीची फसवणुक करुन त्याचे कडील सोन्याचे दागिने घेवुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम १७०, ४२०, ३४ भादंवि. कायद्यान्वये केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार राऊत, ब. नं. ४७८ पो.स्टे. खापरखेडा. मो नं. ४५५४९६७९४० हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**